अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २६ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २३६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

१८ महिन्यांत सोलापूर पाणीटंचाई मुक्त करु!

● उपमुख्यमंत्री फडणवीसांची भाजपच्या संकल्प महाविजय मेळाव्यात ग्वाही

सुराज्य/सोलापूर

सोलापूरकरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लवकरच सुटणार असून आगामी १८ महिन्यांमध्ये समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण सोलापूर पाणीटंचाई मुक्त करू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर व ग्रामीण जिल्ह्यातर्फे संकल्प महाविजय कार्यकर्ता संमेलन गुरूवारी हेरिटेज लॉन येथे झाले. यावेळी फडणवीस यांनी भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

व्यासपीठावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील, खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी, माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख, माजी सहकारमंत्री आमदार सुभाष देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते - पाटील, राजेंद्र राऊत, राम सातपुते, समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, भाजपचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, संघटन सरचिटणीस रुद्रेश बोरामणी, जयवंत थोरात, शशिकांत चव्हाण, धैर्यशील मोहिते - पाटील, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, प्रदेश कार्यकारिणी सदस्य नरेंद्र काळे आदी उपस्थित होते.

फडणवीस पुढे म्हणाले, सोलापूरच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी समांतर जलवाहिनीसाठीची निविदा काढली होती. परंतु गेल्या अडीच वर्षात आघाडी सरकारने या कामाचा सत्यानाश केला. आता सरकार आल्यानंतर पुन्हा या कामाला गती देण्यात येणार असून ६०० कोटींची वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. याशिवाय ३९४ कोटी रुपयांचे गॅप फंडिंगही देण्यात येणार आहे, अशी घोषणा देखील त्यांनी केली.देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदींचे वैश्विक नेतृत्व लाभले आहे. पण देशाचा विकास पाहून काहींच्या पोटात दुखत आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे समीकरण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मोडीत काढली आहे. त्यामुळे ज्यांची दुकाने बंद होत आहेत, ते आता भाजप आणि मोदी सरकारवर टीका करत आहेत. परंतु भारतातील महाराष्ट्रासह भारतातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीच्या पाठीशीच राहणार आहे, असेही फडणवीस म्हणाले.

जिल्हा काँग्रेसमुक्त करण्याचा करा संकल्प

सोलापूर जिल्हा काँग्रेसमुक्त करण्याचा संकल्प प्रत्येक भाजप कार्यकर्त्याने करावा, असे आवाहन माजी मंत्री आ. सुभाष देशमुख यांनी यावेळी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींना विरोध करणारे दलाल आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या प्रमाणावर निधी दिला आहे. ही विकास कामे जनतेपर्यंत पोहोचवून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत, असेही आ. देशमुख यावेळी म्हणाले.

यांचा झाला पक्ष प्रवेश

भाजपच्या संकल्प महाविजय कार्यकर्ता संमेलनावेळी अनेक पक्षातील नेत्यांनी भाजप पक्षात प्रवेश केला. फडणवीस यांच्या हस्ते उपरणे परिधान करून त्यांना पक्ष प्रवेश देण्यात आला. भाजप पक्षात प्रवेश केलेल्यांची नावे : माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, ठाकरे गटाचे उपशहर प्रमुख रामदास मगर, माजी नगरसेविका अनिता मगर, प्रकाश कोडम, गंगाधर बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे रुपेश भोसले, माजी नगरसेवक सुनील खटके, ज्योती खटके, माजी नगरसेवक मंदाकिनी पवार, किरण पवार, काँग्रेसचे जयवंत सलगर, गौतम कसबे, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल घाडगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आनंद भवर, रतन क्षीरसागर, गुरुनाथ कावडे, काँग्रेसचे जगदीश व्हंद्राव, राष्ट्रवादी काँग्रेसचे व्यंकटेश पवार, माजी उपमहापौर सुमन मुदलीयार, रेवती मुदलीयार. भाजप शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी प्रास्ताविक तर संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

पंढरपूरसाठी २७०० कोटी रुपये

अक्कलकोट आणि पंढरपूर तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करून त्याची लवकरच अंमलबजावणी करण्यात येईल. पंढरपूर तीर्थक्षेत्रासाठी राज्यातील सर्वात मोठा २७०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात येत असून त्याचे तीन डिझाईन अंतिम टप्प्यात आहेत. सर्वांना विश्वासात घेऊन हे काम करण्यात येणार आहे.

जिल्ह्याला ४१५ कोटींचा निधी

भाजप सरकारच्या जलयुक्त शिवार योजनेचा परिणाम म्हणून सोलापूर जिल्ह्यातील ३ लाख १७ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. यातून फळबागा विकसित झाल्या आहेत टेंभू योजनेला चालना दिल्यामुळे ५० हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे. आगामी काळात महाराष्ट्र शासनाकडून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास अखंडित वीज देण्यात येणार आहे. यंदाच्या वर्षात शासन १० लाख घरे बांधणार आहे. राज्यात भाजप शिवसेना युतीचे सरकार आल्यापासून सोलापूर जिल्ह्याला तब्बल ४१५ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे.

गारमेंट व्यवसायाकडे द्यावे लक्ष

सोलापुरातील गारमेंट व्यवसायावर हजारो पुरुष व महिला कामगार अवलंबून आहेत. गणवेशाच्या निर्णयामुळे अनेकांच्या रोजगारावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे याकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष द्यावे. तसेच सोलापुरात आयटी सेक्टर उभारणीकडेही लक्ष द्यावे अशी मागणी यावेळी माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांनी केली.

विमानसेवा : मनासारखे काम होईल

सोलापूरच्या विमानसेवेबाबत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विमानसेवेचा प्रश्न अंतिम टप्प्यात आणलेला आहे. सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणीचा प्रश्न ऐरणीवर आहे. त्याचा मी गांभिर्याने पाठपुरावा करीत आहे. लवकरच हा प्रश्न सोडविला जाईल त्यातून सोलापूरकरांच्या मनासारखेच काम होईल.

पाणी वितरण व्यवस्थेबाबत आयुक्तांशी बोलतो

सोलापूर शहरातील पिण्याच्या पाण्याच्या वितरणाबाबत आमदार विजयकुमार देशमुख यांनी भाषणांमध्ये महापालिका प्रशासनावर टीका केली. महापालिका प्रशासनातील काही अधिकारी जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या हेतूने पाणी वितरण व्यवस्थित करत नसल्याचा आरोप आमदार देशमुख यांनी यावेळी केला. यावर पाणी वितरणाबाबत महापालिका आयुक्तांशी मी स्वतः बोलेन असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

शत प्रतिशत भाजपासाठी करा प्रयत्न

आगामी महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, विधानसभा, लोकसभा निवडणुकांमध्ये शतप्रतिशत विजय भारतीय जनता पार्टीला मिळावा यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांनी यावेळी केले. महाविकास आघाडीतील पक्ष कितीही एकत्र आले तरी भाजपला फरक पडणार नाही. जनता भाजपच्याच पाठीशी उभी असल्याचेही पालकमंत्री विखे - पाटील यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी खा. रणजितसिंह नाईक - निंबाळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

नांदणी चेकपोस्ट येथे ट्रकच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

सुराज्य/सोलापूर

विजयपूर महामार्गावरील नांदणी चेक पोस्टजवळ ट्रकच्या धडकेने दुचाकी वरील तरुण ठार तर दुसरा जखमी झाला. हा अपघात बुधवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडला.

हावरूसिद्ध गंगण्णा वड्यार (वय २४ रा.सातलगाव ता. इंडी जि.विजापूर) असे मयत झालेल्या विवाहित तरुणाचे नाव आहे. तो काल रात्री आपल्या दुचाकीवर गुरु मल्लव्या गुंजेटी (वय २६) याच्यासोबत अकलूज येथे निघाला होता. नांदणी चेक पोस्ट मधून बाहेर येणारा एनएल०१-केजी ५४१३ या हा ट्रक धडकल्याने तो गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाला . तर गुरु गुंजेटी हा गंभीर जखमी झाला. जखमीला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

बारावीत सोलापूर जिल्ह्याच्या निकाल ९३.६८ टक्के

सुराज्य/सोलापूर

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल गुरूवारी जाहीर झाला असून त्यात सोलापूर जिल्ह्याच्या निकाल ९३.६८ टक्के लागला आहे.यंदाही मुलींनी मुलांना मागे टाकत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. सोलापूर जिल्ह्यात ५३ हजार २५७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यात ३० हजार ५३८ मुले तर २२ हजार ७१९ मुलींचा समावेश होता. त्यातील ३० हजार २१३ मुलांनी तर २२हजार ५२९मुलींनी परीक्षा दिली.त्यात २८ हजार ०४२ मुले तर २१ हजार ८५० मुली उत्तीर्ण झाल्या.परीक्षेला बसलेल्या एकूण ५२ हजार ७४२ पैकी ४९ हजार ८९२ मुले-मुली उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्यात मुलांची टक्केवारी ९१.८२ तर मुलींची ९६.१७ टक्के इतकी आहे.एकूण निकाल ९३.६८ टक्के इतका लागला.

यंदाही मुलांना मागे टाकत मुलींनी बाजी मारली; कोकण यंदाही अव्वल

विषय निहाय निकाल

	मुले	मुली	एकूण
सायन्स	९७.७५	९८.४६	९८.०६
कॉमर्स	९३.९८	९७.२	९५.५६
आर्टस्	८५.९३	९४.५२	८९.३३
व्यावसायिक	९०.८७	९४.१६	९१.४८
टेक्निकल सायन्स	९६.६२	८०.००	९६.०७

भीमा नदीच्या पात्रातून वाळूचा उपसा केला जाणार

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात भीमा नदीच्या पात्रातून वाळूचा उपसा केला जाणार असून तशी तयारी प्रशासनाने केली आहे. वाळूच्या नव्या धोरणानुसार वाळू डेपो तयार करण्यात येणार असल्याची माहितीही प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदी पात्रात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाळूचा साठा निर्माण झाला आहे. त्यामुळे, ऐन पावसाळ्यात साठलेल्या वाळूमुळे नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह बदलण्याची शक्यता असते. तसेच, यामुळे आसपासच्या गावात पूर येण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

त्यामुळे जलसंपदा विभागाने सूचित केलेल्या ठिकाणचा वाळू उपसा करण्याची तयारी जिल्हा प्रशासनाने केली असून,

नव्या धोरणाप्रमाणे वाळू डेपो सुरू करण्यात येणार : ठोंबरे

लवकरच वाळू काढण्यात येणार आहे. शासनाच्या नव्या धोरणाप्रमाणे वाळू डेपो सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिली.

दि.१९ एप्रिल रोजी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने शासनामार्फत वाळू आणि रेतीचे उत्खनन, साठवणूक आणि ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री याबाबतचे सर्वंकष धोरण जाहीर केले आहे.

पत्नीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून पतीची आत्महत्या

पत्नीसह चार जणांवर गुन्हा दाखल

सुराज्य/मोहोळ

पत्नी अनैतिक संबंध सांगून सुध्दा सोडण्यास तयार नसल्यामुळे कंटाळून पतीने विषारी औषध घेऊन आत्महत्या केल्याची घटना औंढी (ता. मोहोळ) येथे घडली. यामुळे पत्नी, तिचा प्रियकर, सासू आणि अन्य एक अशा ४ जणांविरुद्ध मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मयत मुलाचे वडील हिदूराव भुसे यांनी फिर्याद दाखल केली आहे.

नेताजी भुसे यांची पत्नी शुभांगी यांचे भावकीतील पांडुरंग भुसे यांच्याशी अनैतिक संबंध असल्याचे नेताजींच्या लक्षात आले होते. याविषयी नेताजीने ही गोष्ट आपल्या आई-वडिलांना सांगितली. त्यांनी आपल्या सुनेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस सुरुवातीला ही गोष्ट ऐकली मात्र

काही दिवसानंतर परत त्यांचे अनैतिक चाळे सुरू झाल्यामुळे पुन्हा एकदा शुभांगीचा पती आणि संबंधित पांडुरंग भुसे व भावकीतील काही माणसे त्यांना बोलावून पुन्हा एकदा या दोघांना हे संबंध बंद करण्यासाठी तंबी दिली. तुमचा सुखाचा संसार असून दोन सोन्यासारखी मुले आहेत त्यांच्याकडे बघून झालेले विसरून जावा आणि संबंध बंद करा असे त्यांना सांगितल्यावर पुन्हा काही दिवस त्या दोघांनी ते ऐकले. मात्र पुन्हा त्यांचे चोरून संबंध सुरू झाल्याचे मृत नेताजी यांच्या लक्षात आले. यामुळे वैतागलेल्या नेताजी आणि आपल्या आई-वडिलांना याविषयी माहिती दिली. दि. २३ मे रोजी सकाळी सहाच्या दरम्यान नेताजी हा शेतामध्ये झोपलेल्या अवस्थेत आढळून आला.त्याला उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले. तो उपचारा पूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

यामुळे सून शुभांगी नेताजी भुसे,पांडुरंग द्रोणाचार्य भुसे,आप्पा रामहरी भुसे (तिघेही रा. औंढी ता. मोहोळ) मृताची सासू राधा अक्का जीवनाथ डुकरे (रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

आमचं 'सोंग' ऑनलाईन म्हणजे काठावर पास झालयं!

कल्याण
799-56-240

मेन बाजार
790-61-399

कारखान्यांची साखर, मोलॅसिस व बगॅसची विक्री करून शेतकऱ्यांना १५ टक्के व्याजदराने एफआरपीची रक्कम द्यावी; साखर आयुक्तांचे आदेश

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात २०२२-२३ या गळीत हंगामात गाळप केलेल्या उसापोटी शेतकऱ्यांना अद्यापही एफआरपीप्रमाणे ऊस बिले न दिलेल्या जिल्ह्यातील तीन साखर कारखान्यावर आरआरसी अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.तर उर्वरित कारखान्यांचे प्रस्ताव साखर आयुक्त कार्यालयाकडे पाठविले आहेत.सुमारे १५४ कोटी रुपयांची बिले या कारखान्यांकडून शेतकऱ्यांना देणे बाकी आहे.

आरआरसी कारवाईनुसार या तीनही कारखान्यांनी उत्पादित केलेली साखर, मोलॅसिस व बगॅसची विक्री करून शेतकऱ्यांना १५ टक्के व्याजदराने एफआरपीची ही रक्कम द्यावी, असा आदेशही साखर आयुक्त गायकवाड यांनी दिला आहे. या प्रक्रियेतच साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी या तिन्ही कारखान्यावर कारवाईचा बडगा उचलला आहे. भिलारवाडी (ता. करमाळा) येथील मकाई सहकारी साखर कारखाना, भाळवणी (ता. पंढरपूर) येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना आणि पांडे (ता. करमाळा) येथील विठ्ठल रिफाउंड शुगर या तीन कारखान्यांचा समावेश यामध्ये आहे.

करमाळा तालुक्यातील पांडे येथील विठ्ठल रिफाइंड शुगरकडे ८३ कोटी ७ लाख २१ हजार रुपये, सहकार शिरोमणी वसंतराव

काळे साखर कारखान्याकडे ४४ कोटी २४ लाख ९८ हजार रुपये आणि मकाई साखर कारखान्याकडे २६ कोटी ३२ लाख १८ हजार रुपयांची एफआरपी थकीत आहे. आरआरसी कारवाईनुसार या तीनही कारखान्यांनी उत्पादित केलेली साखर, मोलॅसिस व बगॅसची विक्री करून शेतकऱ्यांना १५ टक्के व्याजदराने एफआरपीची ही रक्कम द्यावी, असा आदेशही साखर आयुक्त गायकवाड यांनी दिला आहे. थकीत एफआरपीच्या या मुद्द्यावरून गेल्या काही दिवसांपासून सातत्याने कारखानदार आणि शेतकरी यांच्यामध्ये संघर्ष सुरु आहे. सध्या मकाई आणि सहकारशिरोमणी या कारखान्याच्या निवडणूका जाहीर झाल्या आहेत. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या रकमा थकीत ठेवून सत्ताधारी पुन्हा निवडणूक रिंगणात उतरले आहेत, यावरूनही मोठा संताप व्यक्त होत आहे. आता अलीकडेच दूधदराच्या प्रश्नावर रास्ता-रोको आंदोलनात शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत थकित ऊसबिलाचा मुद्दाही ताणून धरल्याचे दिसते आहे.

चुंगी येथे शेतीच्या वादातून सत्तुरने हल्ला

सोलापूर : शेती आणि घराच्या वादातून सख्या भावात एकमेकांवर सत्तुरने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना चुंगी येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

सर्व जखमीना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी पहिल्या जखमीचे नाव राजेंद्र सुभाष सुरवसे (वय ४५ रा.चुंगी) असे आहे . त्याला काल सायंकाळच्या सुमारास त्याचा भाऊ स्वामीराव सुरवसे, वडील सुभाष सुरवसे आणि अन्य दोघांनी मिळून ऊस तोडण्याच्या सत्तुर आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली.